मोठं व्हायला ओळख नाही
माणसांची मनं जिंकावी लागतात,
जगातील कुठल्याही तराजूत मोजता न येणारी
एकमेव मोठी वस्तू म्हणजे माणुसकी.

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ८७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.०९ नोव्हेंबर २०२४

## ...त्या सुरतसह महाराष्ट्रात शिवरायांची मंदिरे उभारणार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, बुलडाणा :** लोकसभेच्या निवडणुकीत 'अबकी बार चारसो पार' च्या वल्गना करणाऱ्या महायुतीचे चौखूर उधळलेले खेचर दिल्लीसमोर कधीच न झुकणाऱ्या महाराष्ट्राने रोखले. आताही सर्वसामान्य जनतेच्या आशीर्वादाने प्रज्वलित झालेल्या मशालीच्या ज्वालानी गद्दारांचा कारभार भस्मसात होईल. आघाडी सत्तेत आली तर जिथून गद्दार आसामकडे पळाले त्या सुरत शहरासह महाराष्ट्रात सर्वत्र छत्रपती शिवरायांची मंदिरे उभारणार अशी घोषणा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली.



बुलडाणा विधानसभा मतदारसंघातील उमेदवार जयश्री सुनील शेळके यांच्या प्रचारासाठी बुलडाण्यात आज उद्धव ठाकरे यांची सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत, आमदार मिलिंद नार्वेकर, बुलडाणा मतदारसंघातील ठाकरे गटाच्या (आघाडीच्या) उमेदवार जयश्री सुनील शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. बुलडाणा लोकसभेत कमी मतांनी आघाडीचा पराभव झाला. हा पराभव मनाला चटका लावणारा ठरला. यामुळे एक गद्दार वाचला असे खासदार प्रतापराव जाधव यांचा नामोल्लेख न करता ठाकरे म्हणाले. लोकसभेतील महायशाने आघाडीचे मनोबल वाढले असल्याचे सांगून यामुळे विधानसभेत आघाडी जास्त एकजूट आणि एकदिलाने एकत्र आली आहे. व्यासपीठावरील मित्रपक्षांच्या उपस्थितीने हे सिद्ध झाले. राज्यात आघाडीची हवा नव्हे वादळ असून आघाडीचे सरकार सत्तेत येणार ही काळ्या दगडावरची रेष असल्याचा दावा ठाकरे यांनी केला. चाळीस दरोडेखोरांच्या टोळीने दरोडा घातला, भगवा, धनुष्य आणि पक्ष चोरला असा घणाघात त्यांनी यावेळी केला. युतीचे शिवरायावरचे प्रेम बेगडी आहे. त्यांना केवळ मते मागण्यासाठी शिवराय पाहिजेत. शिवरायांचा जयजयकार ऐकला की देवेंद्र फडणवीस यांचा जळफळाट होतो. मालवणमध्ये कोसळलेल्या छत्रपतींच्या पुतळ्यासारखे यांचे शिवप्रेम पोकळ आहे. भ्रष्टाचार करुन बांधण्यात आलेल्या या पुतळ्याचे अनावरण अशुभ हाताने झाल. शिवरायांचा पराक्रमी महाराष्ट्र यांनी दोन नेत्यांच्या आणि गुजरातच्या चरणी अर्पण केल्याची जहाल टीका ठाकरेंनी यावेळी केली.

## कुरिअरच्या नावाखाली सीएमईच्या प्राध्यापकाची एक लाखांची फसवणूक

**दि.८, पिंपरी :** तुमचे कुरिअर आले असून त्यासाठी दहा रुपये 'गुगल पे'वर पाठवा, असे सांगत सीएमईच्या प्राध्यापकाची एक लाखाची फसवणूक केल्याची घटना दापोडी येथे घडली. प्रा. जयंत हरीभाऊ सावरकर (वय ५८, रा. सीएमई, दापोडी) यांनी दापोडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अजमल खान याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. सावरकर हे लष्करी अभियांत्रिकी महाविद्यालय (सीएमई) मध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना शर्मा नावाच्या व्यक्तीने दूरध्वनी केला. तुम्हाला तुमचे कुरियर हवे असेल तर श्री. ट्रॅक कोन कुरीयर दिल्ली या कंपनीला 'गुगल पे' वरुन दहा रुपये पाठविण्यास सांगितले. 'गुगल पे' ओपन केल्यानंतर मोबाइलचे सुरुवातीचे पाच अंक टाईप करा' असे सांगितले. त्यावर सावरकर यांनी मोबाईलचे सुरुवातीचे पाच अंक टाईप केले. त्यानंतर शर्मा याने, मी आता माझ्या कुरियर वाल्यांना सांगतो की, तुमचे कुरियर पाठविण्याची प्रक्रिया करा. त्यानंतर सावरकर यांना एक दूरध्वनी आला की तुमच्या सोबत काहीतरी फसवणूक होत आहे. ते त्यांच्या दापोडी सीएमई येथील एसबीआय बँकेच्या शाखेत गेले. त्यांनी विचारपूस केली असता त्यांच्या खात्यातून हतीनापूर बारपेटा (आसाम) येथील कॅनरा बँकमध्ये अजमल खान नावाच्या व्यक्तीच्या खात्यावर ९१ हजार ४६९ तसेच धामारायकाराय (तामिळनाडू) येथील कॅनरा बँकेमध्ये अजमल खान नावाच्याच व्यक्तीच्या खात्यावर ८ हजार ४९९ रुपये असे एकूण ९९ हजार ९६८ ट्रान्सफर करून सावरकर यांची फसवणूक केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नीलेश वाघमारे तपास करीत आहेत.

## विरोधकांच्या डोक्याचे नट कसण्यासाठी मी राणांचा पाना

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, अमरावती :** महायुती सरकारने लाडकी बहीण योजना आणली, त्यावेळी महाविकास आघाडीकडून आमच्यावर टीका करण्यात आली. ही योजना फसवी असल्याचे सांगण्यात आले. मात्र, राज्यातील अडीच कोटी महिला या योजनेच्या लाभार्थी ठरल्या आहेत. विरोधक या योजनेच्या विरोधात उच्च न्यायालयात गेले, पण न्यायालयाने देखील योजना बंद करण्यास नकार दिला. महाविकास आघाडीचे नेते लाडकी बहीण योजनेच्या विरोधात आहेत. त्यांच्या डोक्याचे नट कसण्याची गरज आहे, असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी येथे बोलताना लगावला.

बडनेराचे युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा यांच्या प्रचारार्थ बडनेरा मार्गावर आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. रवी राणा यांचे निवडणूक चिन्ह पाना आहे. हा संदर्भ देत देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांवर टीका केली. देवेंद्र फडणवीस म्हणाले, लाडकी बहीण योजना राबवून महायुती सरकार पैशांचा चुराडा करीत असल्याचे



सांगून महाविकास आघाडीच्या सावत्र भावांनी उच्च न्यायालयात दाद मागितली. पण, आम्ही योजना बंद होऊ दिली नाही. भविष्यात देखील ही योजना बंद होणार नाही. या योजनेत महिलांना दरमहा पंधराशे रुपये भावाकडून ओवाळणी म्हणून मिळते. महायुतीची सत्ता पुन्हा आल्यानंतर महिलांच्या खात्यात दरमहा २१०० रुपये जमा होणार आहेत. महाविकास आघाडीचे नेते षडयंत्र करीत राहतील, पण आम्ही लोकहिताच्या योजना बंद पडू देणार नाही. महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या डोक्याचे नट कसण्यासाठी रवी राणांचा पाना मी वापरणार आहे, असा टोला फडणवीस यांनी लगावला.

## जिल्ह्यात लाल कांद्याच्या दरात तेजी कायम
### शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित...

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.८, अहिल्यानगर :** राज्यातील विविध कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून लाल कांद्याची आवक होऊ लागली असून विक्रमी भाव मिळत आहे. यामुळे शेतकर्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. उन्हाळ कांद्याला अहिल्यानगर जिल्ह्यात प्रति क्विंटल ७२०० रुपयांपर्यंत तर लाल कांद्याला ५७०० रुपयांचा भाव नोंदवला गेला आहे. ज्यामुळे सध्या कांदा उत्पादकांच्या चेहऱ्यावर काहीसे हसू पसरले आहे. गत आठवड्यापासून उन्हाळी कांद्याची आवक घटू लागली असून लाल कांद्याची आवक हळूहळू वाढू लागली आहे. मागणी जादा असल्याने दोन्ही कांद्याचे भाव तेजीत आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात संगमनेर बाजार समितीत लाल कांद्याची २७८५ क्विंटल आवक झाली. १८००ते ५७०० रुपयांचा दर मिळाला. कोपरगाव बाजार समितीत ४८७ क्विंटल कांद्याची आवक झाली. भाव १००० ते ४००० रुपये मिळाला. पारनेरात ३१९० किंटल कांद्याची आवक झाली. ५०० ते ५१०० रुपयांपर्यंत दर मिळाला. राज्यात कोल्हापुरात सर्वाधिक दर मिळाला. येथे ३९२२ क्विंटल कांद्याची आवक झाली. भाव १००० ते ७००० रुपयांचा होता. उन्हाळी कांद्याला जिल्ह्यात पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सर्वाधिक दर मिळाला. २४२५ क्विंटल आवक झाली दर २५०० ते ७२०० रूपयांचा मिळाला. कोपरगावात १००० ते ६०२७ रुपये, संगमनेरात २००० ते ६१०० रुपये दर होता. राज्यात सर्वाधिक भाव जुन्नर-ओतूर येथे मिळाला. येथील लिलावात उन्हाळी कांद्याला ७२१० रुपयांचा दर मिळाला.

ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा संचलित,
शि.म.ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब
जि.उस्मानाबाद -४१३५०७
(Re-Accrdited by NACC with B++ Grade & ISO 9001: 2015)




कनिष्ठ महाविद्यालय :- (कला, वाणिज्य व विज्ञान)
विज्ञान मार्गदर्शन वर्ग व वैद्यकिय परीक्षासाठी मार्गदर्शन वर्ग, बालसंगोपण शास्त्र, दुग्ध व्यवसाय व पशुसंवर्धन शास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स.
किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम
१) ॲटो इंजिनिअरींग टेक्निशियन २) फलोत्पादन शास्त्र ३) इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी
वरीष्ठ महाविद्यालय :- (पदवी)
कला, वाणिज्य व विज्ञान व व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम, इलेक्ट्रॉनिक्स, दुग्धव्यवसाय शास्त्र, मत्सशास्त्र, संगणकशास्त्र, फलोत्पादन शास्त्र, कोरडवाहु शेतीशास्त्र, रेशीमशास्त्र या शिवाय बी.ए. ला संरक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षण, गृहविज्ञान शास्त्र
वरीष्ठ महाविद्यालय :- (पदव्युत्तर)
प्राणिशास्त्र, हर्बल टेक्नोलॉजी, भूगोल हे विषय व प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र व भूगोल विषयात संशोधन केंद्र
महाविद्यालयाची वैशिष्ट्ये - सुसज्ज व भव्य इमारत, ग्रंथालय व वाचन कक्षाकरिता स्वतंत्र इमारत सुसज्ज संगणकशास्त्र विभाग, मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह, भव्य क्रीडांगण व अनुभवी प्राध्यापक वृंद.


डॉ. अशोकराव मोहेकर
सचिव, ज्ञान प्रसारक मंडळ, येरमाळा




डॉ. सुनिल पवार
प्राचार्य शि.म.ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

## विनातिकीट प्रवाशांकडून ८० कोटींची दंडवसुली

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, मुंबई :** विनातिकीट प्रवाशांकडून पश्चिम रेल्वे प्रशासनाने गेल्या सात महिन्यांत ८० कोटी रुपयांची दंडवसुली केली आहे. त्यातही दसरा, दिवाळीच्या काळात अनेक प्रवाशांनी गर्दीचा फायदा घेऊन विनातिकीट प्रवास करण्याचा प्रयत्न केला.

मात्र, तिकीट तपासनीसांनी विनातिकीट प्रवाशांवर कारवाई करून एकट्या ऑक्टोबर महिन्यात १२ कोटी रुपयांची दंडवसुली केली. पश्चिम रेल्वेवरील सर्व तिकीटधारक प्रवाशांना आरामदायी प्रवास आणि उत्तम सेवा देण्यासाठी ही मोहीम राबवली जात आहे. लोकल, रेल्वेगाड्या, पॅसेंजर ट्रेन, उत्सव विशेष रेल्वेगाड्यांमधून तिकीट नसलेल्या प्रवाशांना रोखण्यासाठी तिकीट तपासणी पथक सज्ज केले आहेत. तिकीट तपासनीसांच्या पथकांनी गेल्या सात महिन्यांत विनातिकीट प्रवाशांकडून ८०.५६ कोटी रुपयांचा दंड वसूल केला. यामध्ये मुंबई उपनगरीय लोकलमधून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून २६.६० कोटी रुपयांची दंडवसुली केली.

ऑक्टोबर २०२४ मध्ये आरक्षित न केलेल्या सामानासह २.०९ लाख विनातिकीट प्रवाशांचा शोध घेऊन, त्यांच्याकडून १२.१० कोटी रुपये वसूल केले. याशिवाय, ऑक्टोबरमध्ये पश्चिम रेल्वेच्या लोकलमध्ये, फलाटावर ९३ हजार विनातिकीट प्रवाशांना शोधून ३.९० कोटी रुपयांचा दंड वसूल केला.

## महाराष्ट्राच्या राजकारणात फडणवीस यांनी विष कालवले

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.८, श्रीगोंदा (अहिल्यानगर) :** महाराष्ट्रातील राजकारणात विष कालवण्याचं काम कुणी केलं असेल तर ते देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे, असा आरोप खा. संजय राऊत यांनी केला. दरम्यान, त्यांनी यावेळी पक्षाशी गद्दारी करणार्यांवर पुन्हा तोफ डागली. श्रीगोंदा येथे ते बोलत होते. खा. राऊत म्हणाले, रिक्षा चालवायचा तो आता मुख्यमंत्री झाला. ही शिवसेना अशीच आहे. आमच्या पक्षामध्ये शिवसेनेमध्ये ना कोणाचा कारखाना, ना शाळा, ना सूतगिरणी, ना डेअरी, ना दूध उत्पादक संघ, ना बँक. तरीसुद्धा आमचे १८ खासदार आहेत. २०-२० खासदार, ६०-६० आमदार निवडून येतात. ४५ वर्षे मुंबईची महानगरपालिका आम्ही जिंकतोय. भले भले मोदी पण येऊन थकले. ही बाळासाहेब ठाकरेंनी निर्माण केलेली शिवसेना आहे, ही एकनाथ शिंदेची शिवसेना नाही. आले किती गेले किती. सामान्य मराठी माणसाच्या कष्टातून, घामातून, त्यागातून निर्माण झालेली शिवसेना आहे, असा टोला खा. राऊत यांनी गद्दारी करणार्यांना लगावला. ठाकरेंची शिवसेना डरपोक लोकांचा पक्ष नाही. हा स्वाभिमानी मराठी माणासाचा पक्ष आहे. हा सरळ मार्गाने काम करणार्यांचा पक्ष आहे. सत्ता येते, सत्ता जाते. बाळासाहेब ठाकरेंनी आम्हाला नेहमी सांगितलं. आपण सत्तेसाठी जन्माला आलेलो नाही, सत्ता आपल्यासाठी आहे, आपण जिथे बसू तिथे सत्ता सुरू होते. कोपरखळी अन् हशा श्रीगोंद्याचा गमतीशीर इतिहास मी ऐकला. पाचपुत्यांच्या घरात ४०-४० वर्षे सत्ता आहे. साजनने सत्ता चांगली भोगली आहे, म्हणजे सत्तेचं अजीर्ण झाल्यामुळे ते आपल्यासोबत आलेले आहेत, अशी कोपरखळी मारताच एकच हशा पिकला.

अक्षराज

## संपादकीय



### नेपाळची नवी कुरापत

नेपाळ हा भारताचा सख्खा शेजारी देश. जगातील एकमेव हिंदू धर्मीय देश. भारत हा देखील हिंदू संस्कृतीचा पाईक त्यामुळे दोन्ही देशातील चालीरीती, संस्कृती, सण, उत्सव, परंपरा सारखीच त्यामुळे नेपाळ हा भारताचा शेजारी आसला तरी भारताने त्याला कायम छोट्या भावा सारखीच वागणूक दिली आहे. नेपाळवर ज्या ज्या वेळी संकटे आली त्या त्या वेळी भारतच धावून गेला त्यामुळे गेल्या अनेक शतकांपासून भारत आणि नेपाळचे संबंध मैत्रीपूर्ण आणि सौहार्दाचे राहिले आहेत मात्र या संबंधांना मागील काही वर्षात तडा गेला आहे. भारत नेपाळ संबंधातील सौहार्दात कटुता निर्माण होऊन दोन्ही देशात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. हा तणाव कमी करून दोन्ही देशात पूर्वी प्रमाणे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारताकडून होत असताना नेपाळ मात्र काही तरी कुरापती काढून दोन्ही देशातील तणाव कायम ठेवत आहे. नेपाळने अशीच एक नवी कुरापत काढून दोन्ही देशातील तणाव पुन्हा वाढवला आहे. नेपाळने १०० रुपयांची नोट पुन्हा डिझाईन करण्याचा निर्णय घेतला आहे. या नोटा छापण्याचे कंत्राट त्यांनी चीनमधील एका कंपनीला दिले. अर्थात तो त्यांचा अधिकार आहे. नोटा बदलण्याचा, त्याची डिझाईन बदलण्याचा, आणि त्याची छपाई कोठून करायची याचा सर्वस्व अधिकार नेपाळचा असल्याने भारताने त्यावर आक्षेप घेण्याचे कारण नाही भारताने यावर आक्षेप घेतला नाही मात्र ज्यावेळी ही नोट छापून चलनात आली त्यावेळी मात्र भारताने त्यावर आक्षेप घेतला कारण या नव्या नोटेवर नेपाळने त्यांचा नवा सुधारित नकाशा छापला असून त्या नकाशात लीपुलेख, लिम्पियाधूरा आणि कालापाणी हे भूभाग नेपाळमध्ये दाखवले आहेत. वास्तविक भारत - नेपाळ सीमेवरील हे भूभाग भारतीय सीमेत आहे मात्र नेपाळ त्यावर दावा करत आहे. खूप वर्षापासून हा वाद चालू असल्याने दोन्ही देशात यावरून अनेकदा तणाव निर्माण झाला. हा वादग्रस्त भाग असल्याने नेपाळने त्यावर दावा करू नये असे भारताचे म्हणणे आहे. तरीही नेपाळ हा विषय ऐन केन प्रकरणाने उकरून काढत आहे. नेपाळ भारताच्या सातत्याने कुरापती काढत आहे कारण त्याला चीनची फुस आहे. मागील काही वर्षापासून नेपाळ हा चीनच्या नादी लागला आहे. चीनने नेपाळला कर्ज देऊन नेपाळला आपल्या अंकित केले आहे. नेपाळचे सध्याचे सरकार हे चीन धार्जिणे आहे. चीन सांगेल तेच ते करत आहे एकाअर्थी नेपाळमधील विद्यमान सरकार हे चीनच्या हातचे बाहुले आहे त्यामुळेच चीन सांगेल त्याप्रमाणे नेपाळचे सरकार वागत आहे. भारतानेही नेपाळला वेळोवेळी त्यांची चूक दाखवून खडसावले आहे आताही भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी भारताची बाजू स्पष्ट करतांना म्हंटले की नेपाळशही आम्ही आमच्या सीमा प्रकरणांवर एका प्रस्थापित मंचाद्वरे चर्चा करीत आहोत. दरम्यान त्यांच्या बाजूने त्यांनी काही एकतर्फी पावले उचलली आहेत, परंतु त्यांच्याकडून काहीही करून आमच्यातील परिस्थिती किंवा वास्तविकता बदलता येणार नाही.

**काय आहे सीमा वाद ?**

१८१६ मधील अँग्लो - नेपाळ युद्धानंतर नेपाळ आणि ब्रिटिश शासित भारत यांच्यात सुगौलीचा करार झाला. हा करार झाल्यापासून भारत आणि नेपाळ यांच्यात सीमावाद सुरू झाला. या करारा नुसार काली नदीला नेपाळची नैसर्गिक पश्चिम सीमा म्हणून निश्चित करण्यात आली. काली नदीचा पूर्वेकडच्या भागात लिपुलेख, लिम्पियाधुरा आणि कालापानी हा भाग आहे. १९६० पासून हा भाग भारतीय प्रशासनाच्या नियंत्रणाखाली आहे. २०१९ साली नेपाळने या भूभागावर हक्क सांगितल्यावर भारताने त्यावर हरकत घेतली. त्यानंतर २०२० साली नेपाळने आपल्या नकाशात हा भूभाग दाखवला तेंव्हापासून दोन्ही देशात तणाव निर्माण झाला. भारताकडून हा तणाव कमी करण्याचा सातत्याने प्रयत्न होत असताना नेपाळ मात्र चीनच्या नादी लागून सतत भारताच्या कुरापती काढत आहे. आताही चलनी नोटेवर हा भूभाग दाखवून नेपाळने भारताची कुरापत काढून दोन्ही देशातील तणाव आणखी वाढवला आहे.

# मतदान करायलाच हवे !

लोकशाही पद्धतीमध्ये निवडणूक प्रक्रियेला अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे ही प्रक्रिया एखाद्या उत्सवाप्रमाणे पार पडते. राजकीय पक्षाचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते या उत्सवात हिरीरीने सहभागी होत असले, तरी या उत्सवाचा उत्सवमूर्ती असतो तो 'मतदारराजा'. त्याच्या उपस्थितीशिवाय या उत्सवाला अर्थ नसतो. त्याला या सर्व प्रक्रियेत केवळ एकदा सहभागी व्हायचे असते. स्वतः च्या, आपल्या कुटुंबाच्या, समाजाच्या, राज्याच्या पर्यायाने या देशाच्या भवितव्याचा निर्णय त्याला या एका दिवसात घ्यायचा असतो त्यामुळे तो योग्यही असायला हवा हे पाहण्याचे दायित्वही त्याचेच असते. लोकसभा आणि विधानसभा दोन्ही निवडणूका एकाच वर्षात आल्याने यंदा राजकीय पक्ष आणि कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे. हा उत्साह मतदारांमध्ये परिवर्तित करण्यास ते किती यशस्वी ठरतात हे पाहणेही तितकेच महत्वाचे असते. मतदानाचे महत्व किती आहे हे जुन्या जाणत्या मतदारांना ठाऊक नाही असे नाही तरीही निवडणूका जवळ आल्या की प्रशासन मतदारांमध्ये जागृती कारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असते. विविध प्रसिद्धी माध्यमांसह सामाजिक माध्यमांवर मतदान करण्याबाबत जागृती करण्यासाठी जाहिराती दिल्या जातात. गर्दीची ठिकाणे, प्रवासी वाहने यांतूनही मतदारांचे प्रबोधन केले जाते. केवळ मतदारांना जागृत करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. एव्हढे सर्व करूनही मतदानाचा टक्का जेमतेम पन्नाशी पार करतो. ज्या व्यवस्थेत देशातील केवळ पन्नास टक्के जनताच ती घडवण्यात सहभाग घेते ती व्यवस्था



सक्षम आहे असे कसे म्हणता येईल. चार चौघांत या लोकशाही व्यवस्थेचे वाभाडे काढणारी, राज्यकर्त्यांना शिव्या देणारी, राज्याच्या आणि देशाच्या बिघडलेल्या स्थितीवर तोंडसुख घेणारी जनता जेव्हा या सर्वांमध्ये बदल घडवण्याची संधी आपल्या हाती मिळते तेव्हाच पळ का काढते ?

माझे राज्य सक्षम व्हायला हवे, येथील जनता सुखाने नांदायला हवे, येथील नागरिकांना सर्व सोयी-सुविधा आणि संरक्षण मिळायला हवे त्यामुळे यापुढे असे करून चालणार नाही. लोकशाही सक्षम करायची असेल तर सर्वप्रथम मतदान करण्यासाठी घराबाहेर पडायला हवे. त्याहीपुढे जाऊन आपल्या घरातील आणि आपल्या परिसरातील कोणी मतदाता मतदानापासून वंचित राहू पाहत असेल तर त्याचेही प्रबोधन करून त्याला मतदान करण्यास प्रवृत्त करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्यच आहे. लोकप्रतिनिधींच्या कामाबद्दल आपला रोष आपण वर्षभर प्रकट करतच असतो मात्र त्यांना अद्दल घडवण्याची आणि योग्य लोकप्रतिनिधी निवडण्याची संधी आपल्याला पाच वर्षांतून एकदा मिळते ती दवडता कामा नये. गेल्या काही वर्षांत या दोन्ही शहरांतील अनेक मंडळी आपली शहरातील घरे विकून अथवा भाड्याने देऊन अंबरनाथ, बदलापूर, वांगणी यांसारख्या ठिकाणी स्थलांतरित झाली आहेत; मात्र त्यांचे नाव अद्यापही शहरातील त्यांच्या घरांच्या पत्यावरील मतदार याद्यांमध्ये आहे अशा मंडळींना मतदानासाठी वेळ काढून बोलावण्याचे कामही शेजारी राहणाऱ्या मंडळींनी करावे. शहराबाहेर गेलेली ही सर्वच मंडळी मतदानासाठी एव्हढ्या लांबून येतील असेही नाही; मात्र यातील काहीजण तरी आपण केलेल्या आग्रहामुळे लाजेखातर का होईना शहरात मतदान करण्यासाठी नक्कीच येतील. याचसोबत आपल्या शेजारी राहणाऱ्या मंडळींपैकी कोणी मतदानाच्या दिवशी सहलीचे नियोजन करत असेल, तर अशांचेही प्रबोधन करून त्यांचे नियोजन हाणून पाडण्याचे दायित्व आपण घेऊया. प्रमुख शहरांतील निवडणूका अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जातात बऱ्याचदा येथील निकालांवर राज्यातील जनमताचा कौल लक्षात घेतला जातो त्यामुळे या ठिकाणची टक्केवारी वाढवणे राजकीय पक्षांसाठी जिकरीचे असते. शिवाय शहरातील मतदान केंद्रे ही बऱ्याचदा घरापासून एक ते दीड किलोमीटरच्या अंतरातच असतात त्यामुळे ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात मतदान अधिक होणे अपेक्षित असते; मात्र दुर्दैवाने तसे घडत नाही. 'माझ्या एका मताने काय फरक पडणार आहे' ही मानसिकता लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. २००४ च्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीत उमेदवार ए. आर. कृष्णमूर्ती यांना ४०७५१ मते पडली, तर त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवाराला ४०७५२ मते पडली, परिणामी ए. आर. कृष्णमूर्ती यांचा केवळ एका मताने पराभव झाला. २००९ च्या राजस्थान राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री पदाचे दावेदार असलेले सी.पी. जोशी यांना ६२२१५ मते पडली, तर त्यांच्या विरोधात उभे राहिलेल्या कल्याण सिंह चौहान यांना ६२२१६ मते पडली. अटीतटीच्या या लढतीमुळे सी.पी. जोशी यांना आमदारकीसह मुख्यमंत्री पदावरही पाणी सोडावे लागले. १९९९ साली अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना विरोधी पक्षांनी विद्यमान सरकारविरोधात अविश्वास ठराव आणला. वाजपेयी या ठरावाला हिमतीने सामोरे गेले. या ठरावावर झालेल्या मतदानात अटल बिहारी वाजपेयी यांच्या बाजूने २६९ मते पडली, तर विरोधात २७० मते पडली. केवळ एका मताच्या फरकामुळे वाजपेयी सरकार १३ दिवसांतच कोसळले. यंदाच्या लोकसभा निवडणुकीतही अनेक उमेदवार हाताच्या बोटावर मोजता येईल इतक्या फरकाने निवडून आले. एका मताचे महत्व सांगणारी अशी अनेक उदाहरणे जगाच्या राजकारणात होऊन गेली आहेत त्यामुळे एक मताने काय फरक पडणार आहे असे म्हणणेच मुळात चुकीचे आहे. लोकांच्या मनात लोकशाही किती रुजली आहे हे निवडणुकांतील मतदानाच्या टक्केवारीवरून दिसून येते. विश्वातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून बिरुद मिरवणाऱ्या भारतातील मतदारांची मतदानाविषयीची नाराजी निंदनीय आहे, ही टक्केवारी वाढवण्यासाठी आज सर्वांनी मिळून प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## ऐरोली व बेलापूर मतदार संघात स्वीप कार्यक्रमाद्वारे जनजागृती

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, नवी मुंबई :** ऐरोली व बेलापूर या दोन्ही विधानसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी निवडणूक कार्यालये तसेच नवी मुंबई महानगरपालिका यांच्या वतीने मतदार जागरुकतेच्या स्वीप कार्यक्रमांवर भर देण्यात येत आहे.

या अंतर्गत बिंदू माधव नगर दिघा येथील महिला बचत गटांना एकत्रीत करीत मतदार प्रतिज्ञा घेण्यात आली. महिला बचत गटातील सदस्यांनी आपल्या परिचितांना मतदान करण्याचे आवाहन करावे असेही सूचित करण्यात आले. दिघा विभाग कार्यालयातील कर्मचारी व स्वच्छता मित्र यांनीही एकत्रीत येत मतदान करण्याचा निर्धार केला व मतदानाची प्रतिज्ञा सामुहिकरित्या ग्रहण केली.

ऐरोली येथील चिंचपाडा भागातही मागील निवडणूकीत कमी प्रमाणात मतदान झाले अशा मतदान केंद्रांच्या परिसरात गृहभेटी देत जनजागृती करण्यात आली व मतदानाचा अधिकार बजावण्याचे




आवाहन करण्यात आले. वाशी येथे सेक्टर १६ येथील नाका कामगारांना मतदान करण्याविषयी प्रोत्साहित करण्यात आले.

नेरुळ रेल्वे स्थानक, बस डेपो, रिक्षा स्टँड अशा वर्दळीच्या ठिकाणी नागरिकांना एकत्र करुन मतदाना विषयी जनजागृती करण्यात आली. मतदार जनजागृती सेल्फी स्टँडीवर अनेक नागरिकांनी छायाचित्रे काढून आपण मतदान करणार असल्याची ग्वाही दिली.

रबाळे गाव येथील नमुंमपा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपस्थित डॉक्टर, कर्मचारी तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसोबत मतदार जागरुकता प्रतिज्ञा घेण्यात आली. गोठीवली गाव येथील विश्वास बहुउद्देशीय विकास संस्थेमधील महिला सदस्यांशी सुसंवाद साधत त्यांना मतदानाचा अधिकार बजावण्याचे आवाहन करण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, १५० ऐरोली व १५१ बेलापूर विधानसभा मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, ऐरोलीच्या स्वीप नोडल अधिकारी उपआयुक्त अभिलाषा म्हात्रे व बेलापूरचे स्वीप नोडल अधिकारी सहा. आयुक्त सागर मोरे यांच्या माध्यमातून अधिकारी, कर्मचारी यांच्या सहयोगाने स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृतीपर उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.

### निष्कर्ष...

पेड सर्वेअर आपले
सादर करी निष्कर्ष
कल ज्याच्या बाजूने
करती स्वागत सहर्ष

असल्याअहवालाला
नसतो सत्यांचास्पर्श
तयार नवीन जनमत
करे सामान्याआकर्ष

सरळ चालल्यामार्गा
जन्मास उद्रेक संघर्ष
नसते रे सोयरे सुतक
हो चुकीची दिशादर्श

भरकटू टाके सुकाणू
चाले अविचारविमर्श
सत्तापालट करायचा
केवळ खुर्ची अनुकर्ष

सेट सोयीचे नॅरेटिव्ह
हो आपला समुत्कर्ष
सत्य न् स्वप्न दुरावते
निर्माण होई विप्रकर्ष

खोडा घाला रस्त्यात
पाहवत ना परोत्कर्ष
पराभूत भावनामनात
दिसते फक्त धूतशीर्ष

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## भ.श्रीकृष्ण- गायींचा देव- गोविंदा : गोपाष्टमी विशेष

बाळ कृष्णाच्या रंगापासून करामतीपर्यंत सर्वच गोष्टी आपल्याला आवडतात. पण आपणास माहित आहे का? गोपाष्टमी हा मथुरा, वृंदावन आणि इतर ब्रज प्रदेशातील एक महत्त्वाचा सण आहे. हा सण तेथे मोठ्या प्रमाणात साजरा करतात. हा सण भगवान श्रीकृष्ण आणि गायींना समर्पित आहे. या दिवशी भगवान श्रीकृष्णाचे वडील नंद महाराज यांनी वृंदावनातील गायींची काळजी घेण्याची जबाबदारी भगवान श्रीकृष्णांना दिली होती म्हणून हा उत्सव साजरा केला जातो. हिंदू महिन्यातील कार्तिक शुक्ल पक्षातील अष्टमी तिथीला हा शुभ दिवस येतो.

गोपाष्टमीचे महत्त्व- हिंदू मान्यतेनुसार, या दिवशी भगवान श्रीकृष्ण आणि त्यांचा मोठा भाऊ बलराम हे वृंदावनात गायी चारण्यासाठी पहिल्यांदा गेले होते. त्याच प्रमाणे या शुभ सणाशी संबंधित आणखी एक कथा खूप प्रचलित आहे, ती म्हणजे या दिवशी भगवान इंद्राला आपली एक चूक समजली. त्या चुकीसाठी त्यांनी भगवान श्रीकृष्णाकडे क्षमा मागितली. म्हणून सुरभी गाईने भगवान इंद्र आणि भगवान श्रीकृष्ण यांच्यावर दुधाचा वर्षाव केला आणि भगवान श्रीकृष्णांना गायींचा देव गोविंदा म्हणून घोषित केले.

गोपाष्टमी उत्सव- या दिवशी भक्त देवी गाय आणि भगवान श्रीकृष्णाची पूजा करतात आणि निरोगी, समृद्ध आणि उज्ज्वल आयुष्यासाठी त्यांचे आशीर्वाद घेतात. या दिवशी गायींना नवीन वस्त्रे आणि दागिने घालून सजवले जाते आणि भक्त चांगल्या आरोग्यासाठी गायीला विशेष चारा देतात. तसेच, दैनंदिन जीवनात गायींच्या उपयुक्ततेबद्दल तो त्यांना विशेष आदर देतो. या दिवशी दिवसभरात गहू आणि दुधाचे कोणतेही पदार्थ खाणे टाळले जाते.

**!! गोपाष्टमी निमित्त सर्व भाविकांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

**- संकलन व शब्दांकन -**
**श्री.कृष्णकुमार निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३**

## खर्च निरीक्षक मयंक पांडे यांनी केली उमेदवारांच्या खर्चाची प्रथम तपासणी



**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.०८, हदगांव (नांदेड) :** हदगाव विधानसभा मतदार संघातील उमेदवारांच्या खर्चाची प्रथम तपासणी आज खर्च निरीक्षक मयंक पांडे यांनी केली या प्रसंगी काही उमेदवार तर काही उमेदवारांचे प्रतिनीधी उपस्थित होते. गुजरात क्डॅरचे चे २००९ बॅचचे आयकर विभागाचे वरिष्ठ अधिकारी मयंक पांडे हे सुरत येथे आयकर विभागात अतिरिक्त आयुक्त आहेत त्यांच्याकडे भारत निवडणूक आयोगाने नांदेड जिल्ह्यातील किनवट, हदगाव,भोकर,नांदेड उत्तर व नांदेड दक्षिण या विधानसभा क्षेत्राचे खर्च निरीक्षक म्हणून जबाबदारी सोपविली आहे. मयंक पांडे (आयआरएस) यांचा संपर्क मोबाईल क्रमांक ०८४८३८४५२२० आहे.तर त्यांचे संपर्क अधिकारी जिल्हा परिषदचे नांदेडचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना मो.नं ९०११०००९२१ हे आहेत.

खर्च निरीक्षक मयंक पांडे यांनी आज उमेदवारांच्या खर्चाची प्रथम तपासणी करून मार्गदर्शक सूचना दिल्या याप्रसंगी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा हदगावच्या तहसिलदार श्रीमती सुरेखा नांदे, सहायक खर्च निरीक्षक गणेश पुजारी, खर्च विभागाचे पथक प्रमुख सचिन कद्रे आदी उपस्थित असल्याचे मिडिया कक्षातील ए.एम.तामसकर,अनिल दस्तूरकर यांनी कळविले आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज
३ | बुलडाणा, शनिवार, दि.०९ नोव्हेंबर २०२४ | संमिश्र

# थोडक्यात

## टाकळी ढोकेश्वर परिसरात बिबट्याचा वावर शेतकऱ्यांमध्ये पसरले भीतीचे वातावरण



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.८, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल बांडे मळा (गव्हाळी )परिसरात मागिल काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्यामुळे भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. सायंकाळी साडेसहाच्या सुमारास स्थानिकांना बांडे मळा रस्त्यावर बिबट्या वावरताना निदर्शनास आला. याबाबत स्थानिक नागरिकांकडून मिळालेली माहिती अशी, गुरुवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास शेतमजूर रवी रोडगे हे शेतातील काम संपल्यानंतर ते बांडे मळा येथे घराकडे जात असताना गव्हाळी रस्त्यावर बिबट्या आल्याचे निदर्शनास आले. त्यांनी प्रसंगावधान राखत बचाव केला. इतक्यात काही क्षणात बिबट्या मागे वळून झाडीत निघून गेला. त्याचं दिवशी रात्री साडेनऊच्या सुमारास बांडे वस्तीच्या परिसरात बिबट्याने मेंढ्यांच्या कळपावर हल्ला करून एका मेंढीला ठार केले. मेंढ्यांचा खूपच आवाज येऊ लागल्याने मेंढपाळ भागा सातकर तिकडे गेले. बिबट्याने मेंढीवर हल्ला केल्याचे त्यांना दिसले. हे दृश्य पाहून तेही खूप घाबरले. त्यांनी आरडाओरड केल्यानंतर बिबट्या तुरीच्या शेतात पळाला. या घटनेनंतर सकाळी वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन वनविभागाने केले.

दिवसा वीज देण्याचे नियोजन करावे तालुक्यातील ग्रामीण भागातील टाकळी ढोकेश्वर परिसरात सध्या बिबट्यांचा मानव वस्तीकडे वावर वाढला आहे. येथील बहुतांश शेतकरी आपापल्या शेतात घर बांधून राहतात. त्यांच्या पाळीव प्राणी, कुत्रे, शेळ्यांवर हल्ला करणे नित्याची बाब झाली आहे. या शिवारात बिबट्यांचा मुक्त संचार आढळतो. शेतकरी, रस्त्याने जाणाऱ्या वाहनधारकांना कुणाला तरी दर्शन देणाऱ्या बिबट्यांपासून आपला स्वतः चा जीव वाचवीत पिके व पाळीव प्राणी जगविण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. पिंजरे लावून बिबट्यांना जेरबंद करावे, वीजवितरण कंपनीने जास्तीत जास्त दिवसा वीज देण्याचे नियोजन करावे अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

**-- सोमनाथ बांडे, ग्रामपंचायत सदस्य, टाकळी ढोकेश्वर**

## कापूस वेचणीच्या कामासाठी मजुरांना जावे लागते परराज्यात

**अक्षराज : बालाजी गायकवाड**

**दि.०८, हदगांव (नांदेड) :** हदगांव तालुक्यातील माळरानातील शेतातील खरिपाची कामे लवकरच आटोपल्याने, या भागातील बऱ्याच कुटुंबाच्या हाताला काम मिळत नसल्याने, कापूस वेचणीच्या सुगीसाठी त्यांना पर राज्यात जावं लागत आहे.

सध्या राज्यात लोकशाहीच्या उत्सवाची धामधूम असतानाच, या भागातील गरीब कुटुंबीयाची पोटाची खळगी भरण्यासाठी भटकंती वाढली आहे. हा भाग जंगलव्याप्त असून, या भागातील बहुतांश शेती ही माळरान शेती आहे. पावसाळ्यातील पावसाचे पडलेल्या पाण्यावरच या भागातील शेती अवलंबून असल्याने, खरीप हंगामातील उडीद, मुग, कापूस, या पिकावरच बळीराजाची भिस्त आहे. सध्या कापूस वेचणीची सर्वत्र लगबग सुरू असून, माळरानातील अल्प शेती असल्यामुळे बऱ्याच कुटुंबाची कापूस वेचणी आटोपली असल्याने, या भागात रोजगाराची कामे उपलब्ध होत नसल्याने, मजुरांना जागेवर रोजगार मिळत नसल्याने, मजुराचे स्थलांतर होताना दिसत आहे. परिनामी कुसळवाडी, राळावाडी, धन्याची वाडी, तळ्याची वाडी, गवतवाडी, चोरंबा, खरबी, निमटोक, कारला, जांभळ सावली, लोहा, वानवाडी, वारकवाडी, कोंढुर, हळेगांव, वाड्यातांड्यासह आदी आदिवासीबहुल गावातून रोजगारीच्या शोधार्थ परराज्यात जाण्याचा ओघ वाढला आहे. सध्या राज्यात सर्वत्र लोकशाहीच्या उत्सवाचे (विधानसभा निवडणुक)धामधूम असताना, गरीब कुटुंबीयाची पोटाची खळगी भरण्यासाठी भटकंती होण्याने, या भागातील बहुतांश गावे ओस पडल्याच्या मार्गावर दिसत आहेत. याचा परिणाम मतदाराच्या टक्केवारीवर होणार असल्याचे दिसून येते आहे. पण, भाकरीच्या शोधात रानोमाळ फिरणाऱ्या गरीब, कष्टकरी, आदिवासी मजुरासाठी कायम स्वरूपी रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी शेत मजुर रोजगार वर्ग करत आहे.

## राजेंद्र विद्यालयाच्या संघाची खो खो स्पर्धेत राज्यस्तरावर निवड

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.०८, खंडाळा (सातारा) :** आज राजेंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, खंडाळा येथे झालेल्या कोल्हापूर विभागीय शालेय खो खो स्पर्धेत, १४ वर्षांखालील मुलांचा संघाने सांगली जिल्ह्याच्या संघावर मात करून कोल्हापूर विभागात प्रथम क्रमांक पटकावला व संघाची डेरवन,जिल्हा रत्नागिरी येथे होणाऱ्या राज्य स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. सर्व विजयी संघातील सहभागी खेळाडू व त्यांना मार्गदर्शन करणारे सर्व क्रीडा शिक्षक डी. जी.गाढवे, व्हि.एन.गाढवे, महेंद्र गाढवे, व्हि.एस.राऊत, येवले मॅडम,धर्माधिकारी, विवेक तळेकर, प्रशिक्षक दिग्विजय खंडागळे, विनोद खंडागळे, आकाश लिमन, अनिकेत गाढवे यांचे संस्थेचे अध्यक्ष शंकरराव गाढवे,सचिव अनिरुद्ध गाढवे,संस्थेचे सर्व संचालक,प्राचार्य शब्बीर नालबंद,उपप्राचार्य अरूंधती गाढवे, उपमुख्याध्यापक सुशिला मोहिते, पर्यवेक्षक धनंजय महामुनी, सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी तसेच खंडाळा नगरीतील सर्व क्रीडा प्रेमी, ग्रामस्थ यांनी हार्दिक अभिनंदन केले आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## ८५ वर्षांवरील दिव्यांग मतदारांना करता येणार घरीच मतदान

**दि.०८, ठाणे :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये जास्तीत जास्त मतदान व्हावे, यासाठी १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक यंत्रणेने नियोजन केले आहे. भारत निवडणूक आयोगाने ८५ वर्षांपुढील व दिव्यांग मतदार जे मतदान केंद्रापर्यंत जाऊ शकणार नाहीत. त्यांच्यासाठी गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यानुसार १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षावरील मतदारांनी निवडणूक यंत्रणेकडे अर्ज भरून दिले आहेत. या मतदारांसाठी संबंधितांच्या घरी जावून मतदान घेण्यात येणार आहे.

याकरिता १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघातील ८५ वर्षांपेक्षा जास्त वयाचे, दिव्यांग मतदारांची आपआपल्या कार्यक्षेत्रातील बूथ लेव्हल ऑफिसर (इडज) यांनी नोंद करून अर्ज भरून घेतले आहेत. १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षावरील ५ हजार ३०२ मतदार आहेत तर ३ हजार १७३ दिव्यांग मतदार आहेत. तरी १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघातील ज्या ८५ वर्षांवरील व दिव्यांग मतदारांनी गृह मतदानासाठी नोंद केली आहे, त्यांनी याची नोंद घेवून आपला मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन स्वीप पथकाकडून करण्यात येत आहे.

## गुहागर तालुक्याच्या मातीची शपथ घेऊन सांगतो जनतेने मला संधी दिली तर...- प्रमोद गांधी

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०८, गुहागर :** महाराष्ट्रात महाराष्ट्र नवनिर्माण सेना या विधानसभा निवडणुकीत स्वबळावर लढत असल्याने मनसे उमेदवारांच्या प्रचारासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राजसाहेब ठाकरे यांच्या सर्वत्र जाहीर सभा होत आहेत. शुक्रवार दिनांक ८ नोव्हेंबर २०२४ रोजी गुहागर तालुक्यातील शृंगारतळी येथे कोकणातील उमेदवारांच्या प्रचारासाठी राजसाहेब ठाकरे यांची नुकतीच जाहीर सभा झाली.

प्रसंगी २६४ गुहागर विधानससभा मतदारसंघाचे मनसेचे अधिकृत उमेदवार प्रमोद गांधी यांनी उपस्थितांना संबोधित करताना व्यक झाले की राजसाहेब ठाकरे यांनी जो माझ्यावर विश्वास दाखवला आहे तो विश्वास येथे जमलेल्या महाराष्ट्र सैनिक बंधू भगिनींच्या सहकार्याने सार्थ ठरवेन असा विश्वास उपस्थित नागरिकांना दिला. राजसाहेब ठाकरे यांची ही पहिलीच सभा या गुहागर नगरीत होत असल्याचे आनंद व्यक्त करत, खरं तर हा माझ्यासाठी भाग्याचा दिवस असल्याचे गांधी म्हणाले.

खरं तर गुहागर तालुक्याच्या विकासावर




बोलण्यासारखे बरेच काही आहे, येथील विकास फक्त पाखाड्या पूर्ती उरलाय, येथील विद्यमान आमदार पाखाड्या दाखवतायत, रस्ते दाखवतातय मात्र विकास पाहिजे तसा होत नाही असा अप्रत्यक्ष टोला येथील विद्यमान आमदार भास्कर जाधव यांना लगावला. राजसाहेब ठाकरे यांचा जो विकासाचा व्हिजन आहे तो पाखाड्या पलीकडचा आहे. अशा माणसाच्या हाती सत्ता हवी असे प्रत्येकाचे मत आहे. आम्ही प्रत्येक गाव वाडीत फिरतोय तिथे प्रत्येकाला वाटते बदल पाहिजे, बदल हवंय असे ऐकायला मिळते, तो बदल यावेळी होईल याची पूर्ण आम्हाला श्वासवती आहे. येथील आरोग्य सेवा व्हेंटिलेटरवर गेलेली आहे.

गुहागर तालुक्याला एवढा मोठा समुद्र किनारा लाभला आहे, मात्र त्याचा पर्यटन विकास झिरो आहे. येथील तरुण तरूणींना नोकरी नसल्यामुळे ती मुंबई, पुणे शहरात स्थलांतरित होत आहे. हे थांबण्यासाठी येथे नोकऱ्या कशा उपलब्ध होतील, येथील तरुणांना, महिलांना रोजगार कसे आणता येतील यासाठी माझे प्रयत्न असणार आहेत, येथील जि.प.शाळा यांची दुरुस्ती, त्यांना प्राधान्य देणे हेही आमचे मुख्य काम आहे. येथील पाणी, नळ पाणी योजनेंचा भ्रष्टाचार यावर आम्हाला प्रामुख्याने काम करायचे आहे. येथील जे विद्यमान आमदार आहेत त्यांची जी दादागिरी चाललेय, त्यांचा जो अहंकार आहे तो तोडल्याशीवाय जनता गप्प बसणार नाही याचा मला पूर्ण विश्वास आहे.

**शेवटी बोलताना गांधी म्हणाले की, या गुहागर तालुक्याच्या मातीची शपथ घेऊन सांगतो जर मला जनतेने एकदा संधी दिली तर मी त्या संधीच सोन नक्की करेन, गुहागर तालुक्याच जनतेच्या चेहऱ्यावर एक चांगलं हास्य निर्माण होईल अशा प्रकारचा विकास करण्याचा मी निश्चित प्रयत्न करेन हाच याठिकाणी मी शब्द देतो.**

## निवडणुकीच्या प्रचार रॅलीमध्ये महायुतीचे उमेदवार राजेंद्र गावित यांना दाखवले काळे झेंडे

**अक्षराज : वृत्तसेवा**

**दि.८, पालघर :** पालघर जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीत मध्ये मोठ्या प्रमाणत राजकीय नाट्यमय घटना सुरु आहेत. पालघर मतदारसंघात महायुतीचे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार राजेंद्र गावित यांच्या प्रचार रॅलीला स्थानिक ग्रामस्थांचा विरोध होत असून सातपाटी व मुरबे येथे रॅलीच्या दरम्यान निषेधाचा सूर शुक्रवारी उमटल्याचे दिसून आले. केंद्र सरकारने वाढवण आणि मुरबे या भागात प्रस्तावित बंदर उभारणी प्रकल्पाला गती दिली असून याविरोधात पश्चिम किनारपट्टीवरील गावकरी आक्रमक झाले आहेत. मुरबे येथे प्रस्तावित बंदराच्या विरोधात ग्रामस्थांनी काळे झेंडे दाखवले तर ग्राम पंचायतीच्या वतीने बंदराच्या विरोधात निवेदन देण्यात आले.

स्थानिकांनी यापूर्वी वाढवण व मुरबे येथील प्रस्तावित बंदराच्या विरोधात राजेंद्र गावित यांची मुरबे गावात प्रचार रॅली सुरू असताना ग्रामस्थांनी काळे झेंडे दाखवत प्रचार रॅली रोखली. यावेळी राजेंद्र गावित यांनी खासदार असताना या प्रकल्पात विरोधात ठोस भूमिका घेतली नाही, म्हणून गावित यांच्यासह महायुतीच्या धोरणांचा निषेध करण्यात आला. ग्रामपंचायतच्या सरपंच मोनालिसा तरे, उपसरपंच राकेश तरे व ग्रामपंचायत सदस्य यांनी मुरबे बंदराला विरोध करणारे निवेदन राजेंद्र गावित यांना सादर केले. राजेंद्र गावित निवडून आल्यास त्यांनी बंदराच्या विरोधात ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या सोबत उभे राहिले पाहिजे असे ग्रामस्थांनी यावेळी सांगितले.

गावितांची दुटप्पी भूमिका

पालघर मधील केंद्र सरकारचे प्रस्थापित वाढवन व मुरबे बंदर



उभारणीला वेग आला असून , पालघर वासी यांचा या बंदराला तीव्रपणे विरोध आहे. राजेंद्र गावित महायुतीचे पालघर खासदार असताना वाढवून बंदराविरुद्ध त्यांनी विरोध दर्शवत बंदर झाल्यास आपण बुलडोजर खाली जाऊ असे भाष्य केले होते. मात्र केंद्रात व राज्यात महायुतीचे सरकार असताना या सरकारनेच हे बंदर बांधलेला घाट घातला असून गावितांचा विरोध मात्र शमला असल्याची भूमिका दिसत असल्याने गावित नेहमीच न्यूटन घेऊन दुतपी भूमिका घेत असल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. त्यामुळे सध्या ते पालघर विधानसभेचे महायुतीचे उमेदवार असताना प्रचारादरम्यान किनारपट्टीच्या नागरिकाने काळे झेंडे दाखवत त्यांचा निषेध नोंदवला आहे.

## विरोधकांनी फक्त आपल्या तुंबड्या भरवण्याचच काम केलयं : दादाभाऊ चितळकर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.८, पारनेर (अहिल्यानगर) :** महायुती सरकार गोरगरिबांसाठी तिजोरी खाली करत आहे आतापर्यंत विरोधकांनी फक्त आपल्या तुंबड्या भरवण्याचच काम केलयं. ७० वर्षे विरोधकांनी काय केले याचा विचार जनता नक्कीच करणार आहे. निवडणूक डोळ्यासमोर ठेवून कुणी कितीही विकासाच्या गप्पा मारल्या तरीही जनता शाश्वत आणि निरंतर विकास प्रक्रिया राबविणाऱ्या महायुती सरकारच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणार असून सध्याचे राजकारण पाहता गरिबांनी पदाकडे जायचं नाही का नाही..? हे पुढारी राजकारणात घराणेशाही आणू पाहत आहेत. दाते सर अतिशय चांगला उमेदवार आहे, सुसंस्कृत आहे. सर्वसामान्य जनता दाते सरांच्या पाठीमागे उभे राहणार यात काही शंका नसून नगर तालुका दाते सरांना मताधिक्य देणार यात कुठलीही शंका नसल्याचे मत देऊळगाव सिद्धी ता. नगर येथे महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते सर यांच्या गाव भेट प्रचार दौऱ्या प्रसंगी नगर तालुक्यातील ज्येष्ठ नेते दादाभाऊ चितळकर यांनी



व्यक्त केले. सबंधित दौऱ्यात काशिनाथ दाते यांच्या समवेत राष्ट्रवादीचे नेते प्रशांत गायकवाड, भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्वनाथ कोरडे, भाजप तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, सभापती गणेश शेळके, लाडकी बहीण योजना अध्यक्ष सुनील थोरात, जिल्हा परिषद माजी सदस्य वसंतराव चेडे, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष दुधाडे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, नगरसेवक अशोक चेडे, शिवसेना उपतालुकाप्रमुख पंढरीनाथ उंडे, उद्योजक धनंजय निमसे, दत्ता नाना पवार यांच्यासह नगर तालुक्यातील प्रत्येक गावातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांना पारनेर सोबतच नगर तालुक्यातूनही दिसून येत असलेला वाढता प्रतिसाद पाहून महायुतीच्या कार्यकर्त्यांत उत्साह संचारला जात असून एकंदरीत महायुतीच्या गोटात आनंदाचे वातावरण पसरले असल्याचे पहावयास मिळत आहे. पुढे बोलताना चितळकर म्हणाले की, आपण आपलं हित जपलं पाहिजे. हे सरकार आपलं हित जपत आहे. महायुतीच्या सरकारने सर्वसामान्यांसाठी खूप काही कल्याणकारी योजना राबवल्या आहेत. विरोधकांना फक्त सत्ता पाहिजे यासाठी ते जनतेच्या मनात संभ्रम करत आहेत. या सरकारची नाळ समाजाशी जोडली आहे. महायुती सरकारने या अगोदर केलेल्या कामाचेच विरोधकांनी आपल्या घोषणापत्रात घेतले आहे. युती शासनाने महिलांसाठी एसटीमध्ये सवलत, ज्येष्ठ नागरिकांसाठी सवलत, महत्त्वकांक्षी अशी लाडकी योजना आणली, शेतकऱ्यांसाठी विमा सवलत, शेतकऱ्यांची वीज बिले माफ केली. आता भावनिक होऊन मतदान करून उपयोग नाही आपला आवाज विधानसभेत कोण उठवणार याचा विचार केला पाहिजे.

## निवडणूक निरिक्षकांच्या उपस्थितीत राजकीय पक्षांचे उमेदवार व प्रतिनिधींची बैठक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, धाराशिव :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ च्या अनुषंगाने येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत उभे असलेले उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींची बैठक आज ८ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात निवडणूक आयोगाचे निवडणूक निरिक्षक (सामान्य) श्री. गोपाल चंद आणि श्री.पंकजकुमार, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी डॉ.सचिन ओंम्बासे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी उदयसिंह भोसले,सर्व निवडणुक निर्णय अधिकारी गणेश पवार (उमरगा),संजय डव्हळे (तुळजापूर),संजय पाटील (उस्मानाबाद), वैशाली पाटील (परंडा) यांची उपस्थिती होती.

निवडणुक निरीक्षक पंकजकुमार म्हणाले,मतदानाच्या दिवशी मतदानापूर्वी घेण्यात येणाऱ्या अभिरुप मतदानाच्या (मॉक पोल) वेळच्या मतदानाची खात्री उमेदवारांनी प्रत्यक्ष किंवा आपल्या प्रतिनिधी यांनी उपस्थित राहुन करावी.मॉक



पोलच्या वेळी ईव्हीएममध्ये तांत्रिक बिघाड असल्यास उमेदवार प्रतिनिधींनी तात्काळ लक्षात आणून द्यावे.

डॉ.ओंम्बासे म्हणाले,भारत निवडणूक आयोगाने नुकतीच छत्रपती संभाजीनगर येथे बैठक घेवून मतदान केंद्रावर उमेदवार,उमेदवार प्रतिनिधी व मतदारांना मोबाईल घेवून जाण्यास प्रतिबंध राहणार आहे.मतदान केंद्रापासून १०० मीटर परिसरात देखील मोबाईल घेवून जाण्यास प्रतिबंध राहणार आहे.उमेदवारांचे मोबाईल ठेवण्यासाठी मतदान केंद्राबाहेर एक काऊंटर तयार करावे. तसेच उमेदवारांनी सर्व समित्यांची पूर्वपरवानगी घेवूनच निवडणूक प्रचार करावा,असेही त्यांनी सांगितले.

कोणत्या मतदान केंद्रावर कोणते ईव्हीएम मशीन जाणार आहे याची माहिती राजकीय पक्षांना देण्यात येईल.२० नोव्हेंबर रोजी मतदानाची वेळ सकाळी ७ सायंकाळी ६ वाजेपर्यंत आहे.मतदान सुरु करण्याच्या ९० मिनिटे अगोदर मतदान केंद्रावरील मतदान प्रतिनिधी यांचे समक्ष मतदान यंत्रे चालू करुन अभिरुप (मॉक पोल) प्रक्रिया करुनच त्यानंतर सकाळी ७ वाजता मतदानाला सुरुवात करण्यात येणार आहे.मतदानाच्या दिवशी मिळणारी आकडेवारी ही दर दोन तासांनी उपलब्ध होणार असल्याचे डॉ. ओंबासे यांनी सांगितले.

बैठकीत प्रास्ताविकातून माहिती देताना उपजिल्हा निवडणूक अधिकरी श्री.भोसले म्हणाले, जिल्हयातील चारही विधानसभा मतदारसंघात एकूण १४ लक्ष ४ हजार १२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे.यामध्ये ७ लक्ष ३८ हजार ६२८ पुरुष,६ लक्ष ६५ हजार ३४५ स्त्री आणि ३९ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे.१८ ऑक्टोबर २०२४ रोजी मतदान केंद्र अधिकारी-कर्मचारी यांची नियुक्ती करण्यासाठी संगणकीय प्रणालीव्दारे माहिती भरुन प्रथम सरमिसळीकरण करण्यात आले.




# थोडक्यात

## उत्तर महाराष्ट्रात थंडी वाढली...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, मुंबई :** उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यामुळे उत्तर महाराष्ट्रात किमान तापमान १५ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले आहे. शुक्रवारी (८ नोव्हेंबर) नाशिकमध्ये राज्यात सर्वांत कमी १४.६ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. उत्तर महाराष्ट्रात पुढील पाच दिवस थंडी कायम राहण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तरेकडून थंड वारे राज्यात येत आहेत. त्यामुळे प्रामुख्याने उत्तर महाराष्ट्रात आणि मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत किमान तापमानात घट झाली आहे. शुक्रवारी नाशिकमध्ये राज्यात सर्वांत कमी १४.६ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. नगरमध्ये १५.७, जळगावात १५.७, महाबळेश्वरमध्ये १५.२ आणि पुण्यात १६.२ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. उत्तरेकडील वाऱ्याचा प्रवाह पुढील पाच दिवस कायम राहण्याचा अंदाज असल्यामुळे प्रामुख्याने उत्तर महाराष्ट्रात पुढील पाच – सहा दिवस थंडी राहण्याचा अंदाज आहे.

राज्याच्या अन्य भागात थंडी वाढली आहे. मराठवाड्यात १६.५ ते १८ अंश सेल्सिअस, विदर्भात १७.५ ते १९.५ अंश सेल्सिअस आणि किनारपट्टीवर १९.६ ते २५ अंश सेल्सिअस दरम्यान किमान तापमान होते. शुक्रवारी कुलाब्यात २५.२ तर सांताक्रुजमध्ये २२.० अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. दरम्यान, पुढील आठवडाभर राज्यात कुठेही पावसाची शक्यता नाही. ढगाळ हवामान निर्माण होण्याची शक्यता नाही, त्यामुळे तापमान स्थिर राहण्याचा अंदाज आहे.

### कमाल तापमानातही घट

राज्यभरात किमान तापमानात घट झालेली आहे, तशीच कमाल तापमानातही घट झाली आहे. किनारपट्टीवर ३४ ते ३५ अंश सेल्सिअस, मराठवाड्यात ३० ते ३२ अंश सेल्सिअस, मध्य महाराष्ट्रात ३१ ते ३४ अंश सेल्सिअस आणि विदर्भात ३१ ते ३३ अंश सेल्सिअस दरम्यान कमाल तापमान होते. मुंबईत कमाल तापमानात फार घट झाली नसली तरीही हवेतील आर्द्रता कमी झाल्यामुळे मुंबईकरांना दिलासा मिळाला आहे.

## पाम बीच मार्गावरील अपघातात एक ठार, दोन गंभीर जखमी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, नवी मुंबई :** पाम बीच मार्गावर गुरुवारी पहाटे झालेल्या अपघातात एक जण ठार झाला असून दोन जण गंभीर जखमी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. एका कारला पाठीमागून येणाऱ्या भरधाव जीपने जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला. या अपघातात मनीष पेडणेकर (वय ४०) यांचा जागीच मृत्यू झाला तर त्यांच्या पत्नी स्नेहा आणि मुलगी अनन्या गंभीर जखमी झाले आहेत. दोघींवरही वेगवेगळ्या खासगी रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. अपघात झाल्यानंतर वाहनचालक पळून गेला होता. पोलिसांनी त्याचा शोध घेऊन नंतर त्याला अटक केली.

दिघा येथील रहिवासी मनीष पेडणेकर हे पत्नी स्नेहा आणि चार वर्षीय मुलगी अनन्या यांच्यासह गुरुवारी पहाटेच्या सुमारास कारने निघाले होते. नेरुळ येथील सारसोळे चौकात पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या जीपने पेडणेकर यांच्या कारला जोरदार धडक दिली. या अपघातात दोन्ही वाहनांचे प्रचंड नुकसान झाले.

## मुलींना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जाऊ द्या ! अभिनेत्री माधुरी लोकरे यांचे प्रतिपादन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, नांदेड :** आपल्या मुला मुलींचा कल कोणत्या क्षेत्रात आहे हे पाहूनच त्यांना पालकांनी आपले क्षेत्र निवडू द्यावे. प्रत्येक क्षेत्रात संधी उपलब्ध होत असतात. पालकांनी आपल्या अपेक्षा, इच्छा किंवा आकांक्षा त्यांच्यावर लादू नयेत. विशेषतः मुलींना अधिक बंधनं घातली जातात. परंतु अभिनय क्षेत्रात मी माझ्या वडिलांच्या प्रोत्साहनामुळेच माझे करिअर करु शकले. म्हणूनच मुलींना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जाऊ द्या असा सल्ला पाणी चित्रपट फेम अभिनेत्री माधुरी लोकरे यांनी दिला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवी पंडित पाटील बेरळीकर, प्रमुख पाहुणे म्हणून सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा साहित्यिक कवी अनुरत्न वाघमारे, कवी प्रल्हाद घोरबांड, राजेश लोकरे, मीनाक्षी कोकुलवार, संयोजक तथा आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलचे संचालक कवी पांडुरंग कोकुलवार, निमंत्रक प्रज्ञाधर ढवळे आदींची उपस्थिती होती.




येथील आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या वतीने शहरातील मालेगाव रोड स्थित पवननगर येथे दीपावली समारोप कार्यक्रम आणि कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या वतीने दीपावली निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आल्यानंतर दि. ७ रोजी समारोप कार्यक्रम संपन्न झाला. स्वामी विवेकानंद यांच्या मूर्तीचे पुष्पपुजन केल्यानंतर रीतसर कार्यक्रमास प्रारंभ झाला. मान्यवरांच्या सत्कारानंतर माधुरी लोकरे, नागोराव डोंगरे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर झालेल्या गीतगायन आणि कविसंमेलन कार्यक्रमात पंडित पाटील बेरळीकर, अनुरत्न वाघमारे, प्रल्हाद घोरबांड, गझलकार चंद्रकांत कदम, शरदचंद्र हयातनगरकर, थोरात बंधू, साहेबराव कांबळे, प्रज्ञाधर ढवळे, पांडुरंग कोकुलवार, प्रशांत गवळे, योगेश गच्चे, अशोक कुबडे, रुपाली वागरे वैद्य, पंचफुला वाघमारे, पांडुरंग नलबलवार यांनी स्वरचित कवितांचे सादरीकरण व गीतगायन केले.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रज्ञाधर ढवळे यांनी केले. भूमिका पांडुरंग कोकुलवार यांनी मांडली. सूत्रसंचालन रणजित गोणारकर यांनी तर आभार शंकर गच्चे यांनी मानले. दरम्यान माधुरी लोकरे यांचा अभिनय क्षेत्रातील यशाबद्दल चॅनलच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या वेळी शिवाजी कोकुलवार, मनोहर संगमवार, नागभूषण दुर्गम, गणेश भुसा, राजीव राचा, अभय कुरपतवार, अनंत नातेवार, दिलिप डांगे, गजानन पावडे, संजय मोरे, माधव कांबळे, एकनाथ कार्लेकर, धुसे, गंदेवाड, जयंती ढवळे, युवराज ढवळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# शिक्षणाशिवाय व्यक्ती विकास अशक्यप्राय !!


**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**


भारतात स्वातंत्र्यानंतर भारताचे पहिले शिक्षणमंत्री असलेले मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती म्हणून दरवर्षी ११ नोव्हेंबर रोजी 'राष्ट्रीय शिक्षण दिन' साजरा केला जातो. ११ नोव्हेंबर २००८ पासून हा दिवस राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय तत्कालीन केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाने घेतला होता. तेव्हापासून दरवर्षी हा दिवस 'राष्ट्रीय शिक्षण दिन' म्हणून साजरा केला जातो. मौलाना अबुल कलाम आझाद यांनी शिक्षणमंत्री असताना त्यांच्या कार्यकाळात शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा दिवस पाळला जातो. १८ नोव्हेंबर १८८८ रोजी जन्मलेले अबुल कलाम गुलाम मुहियुद्दीन अहमद बिन खैरोद्दीन अल-हुसैनी आझाद हे भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ते, लेखक आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते होते. मौलाना आझाद यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीतही काम केले व त्यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान बहुमोल आहे.

एक अग्रणी विचारवंत आणि विचारवंत म्हणून स्वातंत्र्यलढ्यातील त्यांची भूमिका प्रेरणादायी आहे. त्यांना शिक्षण क्षेत्राची आवड होती आणि त्यांनी सामाजिक बंधुत्व वाढवण्याचे काम केले. आझाद हे त्या काळातील सर्वात प्रभावशाली नेत्यांपैकी एक होते आणि त्यांचा समाजवाद आणि धर्मनिरपेक्षतेवर गाढ विश्वास होता. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते भारत सरकारचे पहिले शिक्षणमंत्री झाले. राष्ट्रीय शिक्षण दिनाचा पहिला सोहळा विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या हस्ते झाला. या दिवशी विद्यार्थी आणि शिक्षक साक्षरतेचे महत्त्व आणि शिक्षणाच्या विविध पैलूंबद्दल त्यांचे विचार मांडतात. विद्यार्थी आणि शिक्षक साक्षरतेचे महत्त्व आणि शिक्षणाच्या सर्व पैलूंशी देशाची बांधिलकी सांगण्यासाठी एकत्र येतात. तसेच विविध शाळांमध्ये अनेक माहितीपूर्ण आणि आनंददायक चर्चासत्रे, निबंध परिसंवाद, भाषण, पोस्टर मेकिंग स्पर्धा आणि रॅली आयोजित करून साजरा केला जातो. अबुल कलाम आझाद यांनी भारताच्या शिक्षण व्यवस्थेत केलेल्या सर्व मूलभूत योगदानांना राष्ट्रीय शिक्षण दिन श्रद्धांजली अर्पण करतो. १९२० मध्ये यूपीमधील अलीगढ येथे



जामिया मिलिया इस्लामिया स्थापन करण्यासाठी फाउंडेशन कमिटीचे सदस्य म्हणून त्यांची निवड झाली. १९३४ मध्ये त्यांनी विद्यापीठाचा परिसर अलीगढहून नवी दिल्ली येथे हलवण्यातही मदत केली. आता कॅम्पसच्या मुख्य गेटला त्यांचे नाव देण्यात आले आहे. पहिले भारतीय शिक्षणमंत्री म्हणून, आझाद यांचे स्वातंत्र्योत्तर भारतातील मुख्य लक्ष ग्रामीण गरीब आणि मुलींना शिक्षण देणे हे होते. १६ जानेवारी १९४८ रोजी अखिल भारतीय शिक्षणावरील परिषदेला संबोधित करताना ते म्हणाले, आपण क्षणभरही विसरता कामा नये, किमान मूलभूत शिक्षण मिळणे हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्क आहे, ज्याशिवाय तो एक नागरिक म्हणून आपले कर्तव्य पूर्ण करू शकत नाही. आपल्या कार्यकाळात त्यांनी देशातील काही उत्तम शैक्षणिक संस्थांची स्थापना केली. त्यांनी दिल्ली विद्यापीठाच्या शिक्षण विभागाची स्थापना १९५१ मध्ये पहिली भारतीय तंत्रज्ञान संस्था आणि १९५३ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना केली. त्यांच्या कार्यकाळात अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद आणि माध्यमिक शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यांचा वारसा लक्षात ठेवण्यासाठी अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाने १९८९ मध्ये मौलाना आझाद एज्युकेशन फाउंडेशनची स्थापना केली.


मनुष्यबळ विकास मंत्रालय दरवर्षी राष्ट्रीय शिक्षण दिनासाठी वेगळी थीम निश्चित केली जाते. देशाच्या शैक्षणिक क्षेत्राची उद्दिष्टे आणि त्या क्षेत्रातील प्रगती लक्षात घेऊन ही थीम निश्चित करण्यात आली आहे. थीमनुसार दिवसभराचे कार्यक्रम आखले जातात. यावर्षी सुध्दा सोमवार, ११ नोव्हेंबर रोजी शिक्षण दिन साजरा केला जाणार आहे. या वर्षीची थीम 'इंब्रेसिंग इनोव्हेशन' आहे २०२२ ची थीम चेंजिंग कोर्स, ट्रान्सफॉर्मिंग एज्युकेशन होती. ही थीम शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्याची आणि ती सध्याच्या काळाशी जुळवून घेण्याची गरज दर्शवते.

आझाद यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी मोठे योगदान दिले होते. राष्ट्रीय शिक्षक दिन साजरा करण्याचा सर्वात मोठा उद्देश म्हणजे लोकांना शिक्षणाचा अधिकार आणि शिक्षणाचे महत्त्व याची जाणीव करून देणे. दरवर्षी ११ नोव्हेंबर रोजी सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये अनेक प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात. मौलाना अबुल कलाम आझाद यांनी १५ ऑगस्ट १९४७ ते २ फेब्रुवारी १९५८ पर्यंत देशाचे शिक्षणमंत्री म्हणून काम केले आणि २२ फेब्रुवारी १९५८ रोजी दिल्लीत त्यांचे निधन झाले. यासाठी त्यांना १९९२ मध्ये सर्वोच्च भारतीय नागरी सन्मान असलेल्या 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. राष्ट्रीय शिक्षण दिन साजरा करणे ही मौलाना अबुल कलाम आझाद यांना श्रद्धांजली आहे. आज सर्वांना मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंती दिनी राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

## बालमृत्यू टाळण्यासाठी जिल्हा परिषदेतर्फे न्यूमोनियाविरोधात विशेष मोहीम

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, नाशिक :** जिल्ह्यातील १५ तालुक्यांतील पाच वर्षे वयाखालील मुलांमधील न्यूमोनियाचे प्रमाण शून्यावर आणून बालमृत्यू टाळण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या वतीने १२ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी या कालावधीत सोशल अवरनेस अॅण्ड अॅक्शन टू न्यूट्रलाइज न्यूमोनिया (सांस) ही मोहीम न्यूमोनिया विरोधात जनजागृतीसाठी राबविण्यात येणार आहे. आदिवासीबहुल त्र्यंबकेश्वर, सुरगाणा आणि पेठ येथे बालमृत्युचे प्रमाण अधिक आहे. जिल्ह्यात वर्षभरात २३८ बालकांचा मृत्यू झाला. बालमृत्युत पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वरमध्ये घट तर, बागलाण, इगतपुरी, दिंडोरीत वाढ झाली आहे. यामुळे प्रशासन सतर्क झाले आहे. मागील वर्षी न्यूमोनियाने २१ मृत्यू



झाले होते. त्यात नऊने घट होत हे प्रमाण १२ वर आले आहे. यंदा कमी वजनाची ४०, जंतुसंसर्ग १३, श्वास घेण्यास त्रास २५, जन्मत: व्यंग असलेली १२ आणि इतर आजारांमुळे १८ बालकांचा मृत्यू झाला आहे. या पार्श्वभूमीवर सांस मोहिमेच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात येणार आहे.

त्र्यंबकेश्वर, सुरगाणा, पेठ या तालुक्यांमधील गरोदर मातांना शोधून त्या ज्या ठिकाणी राहतात, तेथील अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्ती यांच्याकडून त्यांना आरोग्यसेवा घेण्यासाठी प्रवृत्त करण्यात येईल. यामध्ये गरोदरपणाच्या नऊ महिन्यांच्या काळात वेळोवेळी तपासणी करणे, रक्ताची पातळी तपासणी, बाळाची वाढ व्यवस्थित होत आहे की नाही, हे पाहण्यासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात सोनोग्राफीसाठी आणणे, विशेष उपचाराची गरज असल्यास जवळच्या सरकारी रुग्णालयात दाखल करणे, वेगवेगळ्या माता-शिशु शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, यासाठी सांसच्या माध्यमातून प्रयत्न होणार आहेत. त्याकरिता आशा सेविकांना प्राथमिक आरोग्यविषयक शिक्षण देण्यात येणार आहे.

## नोकरीच्या आमिषाने कुंटणखान्यात ५ तरुणींची विक्री

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, पुणे :** नोकरीच्या आमिषाने पुण्यात आणून वेश्या व्यवसायास तरुणींना वेश्याव्यवसायास प्रवृत्त करण्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक व्यापार प्रतिबंध कक्षाच्या पथकाने बुधवार पेठेतील कुंटणखान्यात छापा टाकून पाच तरुणींची सुटका केली. या तरुणींपैकी दोघींना त्यांच्या पतीने वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याची धक्कादायक माहिती तपासात मिळाली आहे.

याप्रकरणी सुमी सौरभ बिश्वास (वय ३५, रा. मरगी गल्ली, बुधवार पेठ, मुळ रा. बोनगाव, जि. चातपाडा, कोलकाता), कुंटणखाना व्यवस्थापक विक्रम आसीम बिश्वास (वय २३, रा. मरगी गल्ली, बुधवार पेठ), विकास उजल मंडोल (वय २१), टॉनी युनुस मुल्ला (वय ३२) यांना अटक करण्यात आली आहे. गुरुवारी मध्यरात्री ही कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक संगीता जाधव, हवालदार रेश्मा कंक आणि त्यांच्या पथकाने छापा घालून तरुणींची सुटका केली.